MHSN050009882024

# नियमीत दिवाणी दावा क्र. १३२/२०२४ मधील नि.१० वरील आदेश

(शरीफ मुसा तांबोळी वि. इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुद्ध झालेला विना कैफियतीचा हुकूम रद्द होणेकरीता केलेला आहे.

२. प्रतिवादीनी असे कथन केले आहे की, दि. २४.०४.२०२४ रोजी त्यांना प्रस्तुत दाव्याचे समन्स प्राप्त झाले आहे. सदर काळामध्ये लोकसभा निवडणुक जाहीर झाल्यामुळे नगरपरिषदेतील अधिकारी निवडणुकीच्या कामामध्ये व्यस्त होते. सबब त्यांना कैफियत देणे अडचणीचे झाले होते. प्रतिवादी यांनी जाणून बुजून कैफियत देणेस कसूर केलेला नव्हता. प्रतिवादी हे सार्वजनिक संस्था असलेने त्यांचे म्हणणे याकामी दाखल होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब प्रतिवादी यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात यावा अशी प्रतिवादीनी विनंती केली आहे.

३. वादीने नि. १३ वर आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवून प्रतिवादीचे अर्जातील कथने खोटी व लबाडीची असलेचे कथन केले. वादीने कथन केले की, यदाकदाचित प्रतिवादींचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींना र.रु. ५,०००/– कॉस्ट करणेत यावी.

**४.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदर कामी जर प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करणेत आला तर त्यांचे पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरचा अर्ज मंजूर झाला तर वादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे दाव्याच्या निराकरणासाठी त्याची मदत होणार आहे. प्रतिवादी ही सार्वजनिक संस्था असून ती लोककल्याणाची कामे करते. तसेच कैफियत देणेस झालेल्या विलंबाचा कालावधी पाहता प्रतिवादींविरुध्द खर्चाचा आदेश न करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | प्रतिवादी यांचा नि. १० चा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादी यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश सेट असाईड करण्यात येतो. |

HEMANT PRAKASH PANCHOLI
Digitally signed by HEMANT PRAKASH PANCHOLI
Date: 2024.10.10 17:12:03 +0530

**इस्लामपूर** **(हेमंत प्र. पंचोली)**

**दिनांक–१०.१०.२०२४** **६वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, इस्लामपूर**